# पुणे विद्यापीठ


दूरध्वनी क्रमांक २५६०११५४,
२५६०११६०,
६५००३७००
६५००३७०१

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०– २५६०११५४

गणेशखिंड, पुणे ४११००७


संदर्भ क्र.विकमं/२०११–१२/९३ दिनांक : १२/०७/२०११

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक,**

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये /
मान्यताप्राप्त संस्था

**विषय :– विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या सभेबाबत....**

महोदय / महोदया,

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधून नियुक्त करण्यात आलेले विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची सभा **शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०११ रोजी, सकाळी १०.३० वाजता, संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेसाठी खालीलप्रमाणे विषय असतील.

१. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना व विशेष मार्गदर्शन योजना मान्यता देणे व कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा ॲडव्हान्स वितरीत करणे.
२. शैक्षणिक वर्ष २०११–१२ मधील विविध उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे.
३. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या इतर योजना या शैक्षणिक वर्षात राबविणेबाबत मार्गदर्शन करणे.

आपल्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस उपस्थित राहणेबाबत सूचित करावे, ही विनंती.

कळावे,

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

(टिप : या कार्यालयाचे पत्र क्र. विकमं/२०११–१२/२७, दि. १५/०६/२०११ नुसार जर आपल्या महाविद्यालयाने कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना व इतर उपक्रमांचे प्रस्ताव सादर केलेले नसतील, त्यांनी सदरचे प्रस्ताव या सभेवेळी सादर करावेत. जेणेकरुन या प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.)